**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/महाडीबीटी/3508 दिनांक : २१.१२.२०१९

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून महाडीबीटी पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन शिष्यवृत्ती योजनांसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. यामध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. याबाबतीत सर्व महाविद्यालय, संस्था, विद्यापीठांना वेळोवेळी परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

**तरी संदर्भिय पत्रानुसार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने भरण्याची अंतिम मुदत दि. १५.०१.२०२० पर्यंत वाढविण्यात आलेली असून, सर्व महाविद्यालय, संस्था, विद्यापीठ स्तरावरुन पडताळणी करण्याची अंतिम मुदत दि. २२.०१.२०२० अशी आहे. सदरची बाब पात्र विद्यार्थ्यांना कळविण्यात यावी. तसेच दि. २१.१२.२०१९ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड नुसार, महाविद्यालय/संस्था/विद्यापीठ स्तरावर खालील प्रमाणे योजना निहाय अर्ज पडताळणीसाठी प्रलंबित असल्याचे आढळून येत आहे.**

Scanned by CamScanner

| Scheme | Pending At Institute |
|---|---|
| Assistance to Meritorious Students scholarship - Junior Level | 319 |
| Assistance to Meritorious Students scholarship - Senior Level | 55 |
| Dr. Punjabrao Deshmukh Vasatigruh Nirvah Bhatta Yojna (DHE) | 228 |
| Education Concession to the Children Freedom Fighter | 1 |
| Education Concession to the Children of Ex-Servicemen | 20 |
| Eklavya Scholarship | 77 |
| Government Research Adhichatra | 0 |
| Government Vidyaniketan Scholarship | 12 |
| Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Shikshan Shulkh Shishyavrutti Scheme | 4,716 |
| Scholarship to Meritorious students possessing Mathematics /Physics | 53 |
| State Government Open Merit Scholarship | 374 |
| State Minority Scholarship Part II (DHE) | 121 |
| Grand Total | 5,976 |

तरी शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवरुन मुदतपूर्व अर्ज भरुन सबमिट करण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच संस्था/महाविद्यालय/विद्यापीठांच्या लॉगीनमध्ये लिपीक व प्राचार्य स्तरावरुन अर्जांची मुदतपूर्व पडताळणी न केल्यामुळे असे प्रलंबित राहीलेले अर्ज सिस्टीमद्वारे आपोआप नामंजूर होतात. त्यामुळे संस्था/महाविद्यालय/विद्यापीठांच्या लॉगीनमध्ये पडताळणीसाठी उपलब्ध असलेल्या अर्जांची रोजच्या रोज **(DAILY BASIS)** पडताळणी करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत संस्था/महाविद्यालय/विद्यापीठांच्या लॉगीनवर शिष्यवृत्ती अर्ज पडताळणीसाठी प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी. तसेच महाविद्यालय स्तरावर अर्ज प्रलंबित राहिल्यामुळे एकही शिष्यवृत्तीपात्र विद्यार्थी वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य/विद्यापीठांचे कुलसचिव यांची राहील याची नोंद घ्यावी.

**(डॉ. मोहन खताळ)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

Scanned by CamScanner